


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २४७ ●शनिवार,दि.०६ डिसेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# धक्कादायक ! कोल्हापुरात दत्त जयंतीच्या महाप्रसादातून २५० हून अधिक भाविकांना विषबाधा

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यातील सांबरे गावात दत्त जयंतीनिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमातील महाप्रसाद खाल्ल्यानंतर तब्बल २५० हून अधिक नागरिकांना विषबाधा झाल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. शुक्रवारी दुपारनंतर उलटी, जुलाब, पोटदुखी व मळमळ यासारखी लक्षणे दिसू लागल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. लहान मुले, महिला, पुरुष व वृद्धांसह आजूबाजूच्या १० ते १५ गावांतील भक्तांना हा त्रास झाला असून, बाधितांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सांबरे गावात शुक्रवारी सकाळी दत्त जयंतीनिमित्त भव्य धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन झाले होते. या सोहळ्याला जवळपास दोन हजारहून अधिक भक्त उपस्थित होते. कार्यक्रमानंतर



**●आरोग्य यंत्रणेवर ताण ; जमिनीवर उपचार**

एकाच वेळी इतक्या मोठ्या संख्येने रुग्ण दाखल झाल्याने आरोग्य यंत्रणेची मोठी तारांबळ उडाली. रुग्णालयांमध्ये बेड अपुरे पडल्याने काहींवर जमिनीवरच उपचार करण्यात आले. यावेळी औषधे आणि इतर सुविधांचीही कमतरता भासली असून, नातेवाईकांच्या गर्दीने रुग्णालय परिसर भरून गेला होता. तर बेळगावातील केएलई वैद्यकीय संघाची टीमही सांबरे गावात दाखल झाली असून, ती तपासणी करत आहे. सर्व रुग्णांची प्रकृती सध्या स्थिर असली, तरी इतरांनी त्रास झाल्यास घाबरून न जाता नजीकच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

सर्वांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. दुपारनंतर अचानक अनेकांची तब्येत बिघडली. मिळालेल्या माहितीनुसार, सुरुवातीला १०० ते १२५ रुग्णांवर नेसरी ग्रामीण रुग्णालय आणि गडहिंग्लज उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू होते, तर इतरांना कानडेवाडी, माणगाव, कोवाडसह खासगी दवाखान्यांमध्ये दाखल करण्यात आले आहे. ► उर्वरित पान २ वर

# संतोष देशमुख हत्येचा धसका!

## बीडमध्ये पोलिसांचा भल्याभल्यांना दणका

**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अपहरण व हत्येच्या घटनेनंतर जिल्ह्यातील वाळू माफियागीरी, शस्त्र परवाने आदी कायदा आणि सुव्यस्थेचे मुद्दे समोर आले.त्यामुळे गृह आणि महसूल विभागाने शस्त्र परवाने रद्द करण्याची मोहिम हाती घेत वर्षभरात तब्बल ३६५ रिव्हॉल्वरचे (अग्नीशस्त्र) परवाने रद्द केले




आहेत. या वर्षभरात नव्याने केवळ चार शस्त्रपरवाने वाटप करण्यात आले. मागच्या वर्षी डिसेंबरमध्ये संतोष देशमुख यांच्या खुनानंतर जिल्ह्यातील इतरही कायदा आणि सुव्यवस्थेचे मुद्दे चर्चेत आले. यात रिव्हॉल्वरच्या परवान्याचा मुद्दाही समोर आला. जिल्ह्यात जानेवारी महिन्यात तब्बल १२८१ शस्त्र परवाने होते. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सुत्रधार वाल्मीक कराडकडेही शस्त्र परवाना होता. दरम्यान, काही परवानाधारक हवेत फैरी करताना, हातात ► उर्वरित पान २ वर

# राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात; उभ्या ट्रकवर ट्रॅव्हल्स धडकली, तिघांचा मृत्यू, ८ प्रवाशांची प्रकृती चिंताजनक

**गोंदिया । प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्गावर उभ्या असलेल्या ट्रकवर भरधाव ट्रॅव्हल्स धडकल्याने भीषण अपघातात तिघांचा मृत्यू झाला. तर ४० प्रवासी जखमी आहे. त्यातील आठ प्रवाशांची प्रकृती चिंताजनक आहे. देवरीनजीक धोबीसराळ येथे गुरुवार मध्यरात्री १२ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. अपघातातील जखमी व मृत हे छत्तीसगड कवर्धा, खैरागड येथील आहेत. हे सर्व प्रवासी मजूर असून कामासाठी चंद्रपूरकडे जात होते.



प्राप्त माहितीनुसार, देवरीपासून २ किमी अंतरावर असलेल्या धोबीसराळ या गावाजवळ राष्ट्रीय महामार्गावर इंधन संपल्याने बंद अवस्थेत ट्रक क्रमांक सीजी ०४ एनटी ५०९६ उभा होता. कवर्धा छत्तीसगड येथून चंद्रपूर येथे दररोज जाणारी कांकेर ट्रॅव्हल्स बस क्रमांक सीजी १९ बीएल ८००१ ने उभ्या ट्रकला मध्यरात्री जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात ४० प्रवासी जखमी झाले. त्यात एक महिला सुनीता हेमलाल बघेले (वय ३५) रा. खैरागड हिचा जागीच मृत्यू झाला. तर जखमी प्रवाशांवर देवरी ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. त्यापैकी ११ गंभीर ► उर्वरित पान २ वर

# सौर ऊर्जेच्या वापरामुळे विजेच्या दरात कपात करणार: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

देशात महाराष्ट्र सौर ऊर्जेचा शेतीत सर्वाधिक वापर करणारे राज्य ठरले आहे. शेतकऱ्यांसाठी फिडर सौर ऊर्जेवर आणून स्वतंत्र १६ हजार मेगावॅट निर्मिती करु. त्यामुळे अन्य वापरातील विजेच्या दरात आपण दरवर्षी ३ टक्के कपात करुन ग्राहकांना स्वस्त वीज देऊ शकतो,असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेत महाराष्ट्राने विश्वविक्रम केला आहे. महावितरणने एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषीपंप स्थापित करण्याचा उच्चांक गाठला. या विक्रमाची गिनिज बुकमध्ये नोंद झाली. गिनीज बुकतर्फे विश्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान सोहळा छत्रपती संभाजीनगरच्या शेंद्रा एमआयडीसीमध्ये ऑरिक सिटी मैदानावर पार पडला. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ► उर्वरित पान २ वर

# जामखेडमध्ये नर्तिकेनं लॉजवरच संपवलं जीवन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या जामखेड शहरातील तपनेश्वर भागात राहणाऱ्या कला केंद्रात नृत्यांगना म्हणून काम करणारी दिपाली पाटील हिने खर्डा रोडवरील साई लॉजमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या घटनेने शहरात खळबळ उडाली असून दीपाली पाटील ही मूळची कल्याण येथील रहिवाशी आहे. आपल्या काही मैत्रिणींसोबत ती सध्या जामखेडमधील तपनेश्वर भागात राहत होती. सकाळी बाजारात जाऊन येते असे सांगून ती बाहेर पडली. परंतु अनेक




तास उलटूनही परत न आल्याने मैत्रिणींनी शोधाशोध सुरू केली. तसेच, दिपाली ज्या रिक्षाने गेली त्या चालकाकडून चौकशी केली असता, त्याने तिला साई लॉज येथे सोडल्याचे सांगितले. त्यामुळे, मैत्रिणी सायंकाळी लॉजमध्ये पोहोचल्या असता रुम आतून लॉक होती. लॉज कर्मचाऱ्यांनी डुप्लिकेट चावीने दरवाजा उघडला असता दिपालीने पंख्याला गळफास घेतल्याचे आढळले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन ► उर्वरित पान २ वर

# फुलंब्रीत रोहयो घोटाळ्यात मोठी कारवाई; सात रोजगार सेवक निलंबित, ११ कर्मचाऱ्यांना नोटीस




**फुलंब्री । प्रतिनिधी**

रोजगार हमी योजनेअंतर्गत फुलंब्री तालुक्यात राबविण्यात येत असलेल्या मातोश्री पाणंद रस्ते योजनेच्या कामातील घोटाळ्याप्रकरणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांनी सात रोजगार सेवकांच्या सेवा समाप्तीचे आदेश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे दोन सहायक कार्यक्रम अधिकारी, सात अभियंते आणि दोन संगणक ऑपरेटर अशा एकूण ११ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. फुलंब्री तालुक्यातील ३३ गावांतील ९६ कामांसाठी मजुरांचा एकच सामूहिक फोटो; तसेच महिला ► उर्वरित पान २ वर

# शेतकरी कर्जमाफीचा फॉर्मुला ठरला हो...! शेतकऱ्यांना इतिहासात पहिल्यांदाच मिळणार अशी कर्जमाफी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांसाठी आताच्या घडीची सर्वात मोठी अन एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. तुम्ही पण शेतकरी असाल किंवा शेतकरी कुटुंबातून येत असाल तर आजची बातमी खास तुमच्यासाठी आहे. वास्तविक, ही बातमी आहे शेतकरी कर्जमाफी संदर्भात. गेल्या अनेक दिवसापासून ज्याची चर्चा होती त्या शेतकरी कर्जमाफीचा फॉर्मुला अखेर फायनल करण्यात आला आहे. खरेतर,



राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत दिलासादायक आणि मोठी अपडेट सरकारकडून देण्यात आली असून, यंदाच्या कर्जमाफी योजनेत रकमेची कोणतीही मर्यादा ठेवली जाणार नाही, असा दावा केला जात आहे. पूर्वीच्या कर्जमाफी योजनांमध्ये १.५ ते २ लाख रुपयांपर्यंतची श्रेणी निश्चित असल्याने अनेक शेतकरी लाभापासून वंचित राहिले होते. मात्र, नव्या निर्णयामुळे ही मर्यादा पूर्णतः हटवण्यात आली असून, शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज सातबारा कोरा करण्याचा निर्धार राज्य सरकारने व्यक्त केला आहे. सध्या राज्यातील जवळपास २४ लाख ७३ हजार शेतकरी बँकांच्या थकबाकीत आहेत. यामध्ये एकूण थकित कर्जाची रक्कम ३५,४७७ कोटी रुपये इतकी असल्याची माहिती ► उर्वरित पान २ वर

# शेकडो उड्डाणे रद्द, इंडिगोच्या सीईओंनी मागितली माफी, विमानसेवा कधीपर्यंत होणार सुरळीत?

**मुंबई । प्रतिनिधी**

इंडिगो विमानसेवेवर देशभरात झालेल्या परिणामाचा शुक्रवारी सर्वाधिक फटका प्रवाशांना बसला. देशभरातील एक हजारांहून अधिक इंडिगोची उड्डाणे शुक्रवारी रद्द झाली असून शनिवारनंतर याचे परिणाम हळूहळू कमी होतील, अशी माहिती इंडिगोचे उएज पीटर एल्बर्स यांनी दिली. एका व्हिडीओ



संदेशाच्या माध्यमातून त्यांनी प्रवाशांना याबाबतचा तपशील दिला. 'शुक्रवारी इंडिगोच्या एकूण उड्डाणांपैकी सुमारे निम्मी उड्डाणे रद्द झाली. मात्र ही परिस्थिती सुधारण्यासाठी तीन स्तरांवर प्रयत्न करण्यात येतील,' असे ते म्हणाले. 'ग्राहकांशी संवाद साधणे, त्यांच्या गरजा लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. १० ते १५ डिसेंबरदरम्यान ही सेवा पूर्वपदावर येऊ शकते, असा अंदाज त्यांनी वर्तवला. सोशल मीडियाच्या माध्यमातून ग्राहकांना माहिती दिली जात आहे,' त्यांनी सांगितले. 'तिकिटांच्या परताव्याबद्दलही माहिती दिली जात असून यासाठी कॉल सेंटर उभारण्यात आले आहे. देशातील मोठ्या विमानतळांवर गुरुवारपासून कठीण परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रवाशांचा खोळंबा झाला होता. मात्र या प्रवाशांना शुक्रवारी प्रवास करता यावा, यासाठी प्रयत्न करण्यात आले आणि त्यामध्ये यश मिळाले. ज्या प्रवाशांना विमाने रद्द झाल्याचा संदेश पोहोचला आहे त्यांनी विमानतळावर येऊ नये,' असे आवाहन त्यांनी केले. 'शनिवार सकाळपासून इंडिगोच्या सेवेची नवीन ► उर्वरित पान २ वर









# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचे शिल्पकार

भारतीय इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी होऊन गेले आहेत की त्यांचे कार्य, विचार आणि जाणीवा एका कालखंडापुरत्या मर्यादित राहत नाहीत; त्या पिढ्यानपिढ्या समाजाला दिशा देतात, प्रेरणा देतात आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला नव्या उंचीवर नेतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असेच कालजयी व्यक्तिमत्त्व होय. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका नेत्याची आठवण नव्हे, तर न्याय, समता, स्वाभिमान आणि संघर्षाच्या मूल्यांना पुनश्च जागृत करणे होय. भारतातील दलित, वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी केलेले कार्य हे मानवाधिकार, सामाजिक लोकशाही आणि समतामूलक राष्ट्रनिर्मितीचे ध्वजवाहक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्यासाठी सुरुवातीला ज्या सामाजिक आणि ऐतिहासिक वास्तवात त्यांनी जीवनाची सुरुवात केली ते समजणे आवश्यक आहे. अस्पृश्यता ही जणू सामाजिक संस्थाच बनली होती. जन्म म्हणजे कर्म, आणि कर्म म्हणजे जात ही विचारधारा भारतीय समाजावर ठसवण्यात आली होती. परंतु या रूढीवाद, अवैज्ञानिकता आणि सामाजिक विषमतेचे निःशब्द बळी होण्याऐवजी त्यांनी त्याविरोधात बौद्धिक क्रांती उभारली. समाजाने दिलेली ओळख स्वीकारण्याऐवजी त्यांनी स्वतःची ओळख ज्ञान, संघर्ष आणि नेतृत्वातून घडवली. ते म्हणत असत की माझे आयुष्य हे जन्माचे फळ नाही, तर माझ्या संघर्षाचे यश आहे.

त्यांनी शिक्षणाला मुक्तीचे माध्यम बनवले. शिक्षण मिळवणे हे जणू त्यांच्या जीवनातील सामाजिक अन्यायाविरुद्धचे पहिले युद्धच होते. समाजाने 'अस्पृश्य', 'अयोग्य' म्हणत जे दरवाजे बंद केले, ते त्यांनी मेहनतीने, बुद्धिमत्तेने आणि



चिकाटीने उघडले. कोलंबिया विद्यापीठातून पीएच.डी., लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधील बॅरिस्टर, कायद्याची पदवी यामुळे ते फक्त भारतासाठीच नव्हे तर जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त विचारवंत ठरले. त्यांचे अध्ययन केवळ पुस्तकापुरते मर्यादित नव्हते; ते सामाजिक वास्तवाचे अभ्यासक होते. त्यांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, कायदा, राजकीय तत्त्वज्ञान, स्त्री-अधिकार, धर्म, इतिहास, मानवाधिकार आणि सामाजिक मानसशास्त्र अशा अनेक क्षेत्रांत अभ्यास केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक कार्याचा पाया त्यांच्या व्यक्तीगत संघर्षातून उभा राहिला. जिथे एक 'जात' मनुष्याच्या अस्तित्वाचे मूल्य ठरवत होती, तिथे त्यांनी मानवतेचा, बंधुत्वाचा आणि समतेचा नवा सामाजिक अर्थ प्रस्तावित केला. महाडचा चवदार तळे सत्याग्रह हा फक्त पाण्याचा प्रश्न नव्हता तर तो मानवी प्रतिष्ठा आणि मूलभूत हक्कांचा प्रश्न होता. त्या आंदोलनात हम पानी लेंगे, हक्क से लेंगे! असे त्यांनी सांगत भेदभावग्रस्त समाजाला पहिल्यांदा स्वाभिमानाची ताकद दिली. नंतर नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहामध्ये त्यांनी धार्मिक क्षेत्रातील भेदभावाला थेट आव्हान दिले. मनुष्य देवाच्या निर्मितीचा असतो, परंतु जातव्यवस्था मनुष्यांच्या बनावट नियमांची ही घोषणा ज्या समाजात अस्पृश्यांना देवासमोर उभे राहण्याचा अधिकार नव्हता, त्या समाजात क्रांतिकारी होती. या आंदोलनांनी अस्पृश्यतेच्या भिंती फक्त हादरवल्या नाहीत, तर कोसळायला सुरुवात केली. त्यांच्या सामाजिक कार्याचा आणखी एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे महिलांसाठी दिलेले अधिकार. स्त्रियांच्या शिक्षणाचे, समतेचे आणि स्वातंत्र्याचे त्यांनी सर्वाधिक जोरदार समर्थन केले. हिंदू कोड बिलच्या माध्यमातून स्त्रियांना संपत्ती, विवाह, घटस्फोट आणि पुनर्विवाहाच्या अधिकारांची हमी देण्याचा त्यांचा प्रयत्न हा स्त्री-मुक्तीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरला. तथापि, या सुधारणा मंजूर करण्यास विरोध झाल्याने त्यांनी मंत्रीपदाचा राजीनामा देताना स्पष्टपणे सांगितले की जे समाज स्त्रीला समानता देत नाहीत, त्यांची प्रगती कधीही होऊ शकत नाही. भारतीय संविधानाच्या रूपात त्यांनी देशाला नव्या सामाजिक व्यवस्थेचा आराखडा दिला. हे संविधान फक्त कायद्यांचा संच नाही तर ते भारतीय नागरिकांच्या स्वातंत्र्याचे, सन्मानाचे आणि मानवाधिकारांचे संरक्षण करणारे जिवंत दस्तऐवज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत की राजकीय लोकशाही पुरेशी नाही; ती सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीवर आधारित असली पाहिजे. यामध्येच भारतीय समाजक्रांतीचे मूलतत्त्व दडलेले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक क्षेत्रातही मोठे योगदान दिले. भारतातील शेतकरी, कामगार यांचे प्रश्न त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून मांडले. जमीन सुधारणा, राष्ट्रीय जलनीती, औद्योगिकीकरण, बँकिंग क्षेत्र, वित्तीय व्यवस्थापन आणि कामगार कायदे या सर्व क्षेत्रांत त्यांनी मार्गदर्शक धोरणे मांडली. रिजर्व्ह बँकेच्या स्थापनेमागील त्यांची आर्थिक संकल्पना ही त्यांच्या अभ्यासाची खोली दर्शवणारी होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य फक्त समाजसुधारणेपुरते मर्यादित नव्हते तर ते मानवमुक्तीचे अभियान होते. त्यांनी धर्माच्या नावावर चालणाऱ्या अन्यायाला आव्हान दिले आणि अखेर १४ ऑक्टोबर १९५६ रोजी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्म स्विकारला. हा निर्णय संतापाचा नव्हता, तर आत्मसन्मानाचा आणि विवेकाधिष्ठित धर्माचा स्वीकार होता. ते म्हणाले होते की मी हिंदू म्हणून जन्मलो, हे माझ्या हातात नव्हते; पण मी हिंदू म्हणून मरणार नाही, हे मी ठरवले. आणि या निर्णयातून त्यांनी भारतीय इतिहासाला नव्याने 'बौद्धयुग' दिले.

आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतीदिनाच्या निमित्ताने आपण त्यांच्या विचारांकडे पाहतो तेव्हा एक प्रश्न उभा राहतो की त्यांचे स्वप्न कितपत पूर्ण झाले? संविधानाचा आदर करणे, समानता स्वीकारणे, जातभेद नष्ट करणे, मानवतेच्या मूल्यांचे पालन करणे ही मूल्ये आज अजूनही संघर्षात आहेत. जातीय हिंसा, सामाजिक विषमता, आर्थिक असमानता, महिलांवरील अत्याचार, धार्मिक ध्रुवीकरण आणि शिक्षणातला वर्गविचार आजही अस्तित्वात आहे. म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक चळवळ संपलेली नाही तर ती अजूनही चालूच आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मंत्र शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मंत्र केवळ घोषवाक्य नसून सामाजिक परिवर्तनाचे क्रियासूत्र आहे. शिक्षण हे व्यक्तीला विचार देतं; संघटना व्यक्तीला शक्ती देते; आणि संघर्ष व्यक्तीला इतिहास बदलण्याची ताकद देतो. हा संघर्ष द्वेषाचा नाही; तर न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेच्या स्थापनेसाठी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची महत्ता फक्त भारतीय समाजापुरती मर्यादित नाही तर जगातील सामाजिक न्यायाच्या लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मानवसंस्कृतीच्या इतिहासात अभिमानाने घेतले जाते. ते फक्त संविधानकार नाहीत; ते मानवतेचे अभियंते आहेत. ते फक्त नेता नाहीत; ते विचारयुगाचे निर्माता आहेत. ते फक्त इतिहासाचा भाग नाहीत; तर ते भविष्याचा मार्ग आहेत. आज ६ डिसेंबर रोजी असणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्मृतीदिन हा केवळ अभिवादनाचा क्षण नसून जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. त्यांच्या कार्याचे, तत्त्वज्ञानाचे, सामाजिक उभारणीच्या दृष्टिकोनाचे अनुसरण करणे हीच खरी कृतज्ञता आहे. त्यांचा विचार जिवंत राहिला, न्यायव्यवस्था समतामूलक राहिली, समाजाने मनुष्याला मनुष्य म्हणून स्वीकारले तरच त्यांचे स्वप्न पूर्ण होईल. आपण सर्वांनी एकत्र येऊन केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला नव्हे, तर त्यांच्या विचारांना वंदन करणे ही काळाची गरज आहे. अशा या ज्ञानाच्या प्रतीकला विनम्र अभिवादन....

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

◆ पान १ वरून पुढे...

## धक्कादायक ! कोल्हापुरात...

घटनेची माहिती मिळताच प्रांताधिकारी एकनाथ काळबांडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक चंद्रकांत खोत आणि तालुका आरोग्य अधिकारी गीता कोरे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेत उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. आरोग्य विभागाने गावात पथके पाठवून घरोघरी तपासणी सुरू केली असून, महाप्रसादाचे नमुने प्रयोगशाळेसाठी पाठविण्यात येणार आहेत. महाप्रसादातून इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या विषबाधेचे नेमके कारण शोधण्यासाठी सविस्तर तपास सुरू आहे. या घटनेमुळे स्थानिक प्रशासनाने धार्मिक कार्यक्रमांतील अन्नपदार्थांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, भविष्यात अशा प्रकार टाळण्यासाठी कडक नियम लागू करण्याची चर्चा सुरु झाली आहे. तर परिसरातील ग्रामस्थांमध्ये संभ्रम आणि घबराटीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान या घटनेने सांबरे आणि परिसरातील ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. दत्त जयंतीसारख्या पवित्र उत्सवात असे संकट कोसळणे ही धक्कादायक बाब आहे. मात्र प्रशासनाने तातडीने केलेल्या उपाययोजनांमुळे परिस्थिती नियंत्रणात येत असली, तरी बाधितांच्या पूर्ण बरे होण्यासाठी आणखी काळ लागेल.

## संतोष देशमुख....

पिस्टल घेऊन शायनिंग असे फोटोही समोर आले. यावरुन वर्षाच्या सुरुवातीला गुन्हेही नोंद झाले. याच दरम्यान, ४९ परवानाधारकांनी स्वत:हून परवाने समर्पित केले. महसूल विभागाने गृह विभागाकडून अहवाल घेतल्यानंतर पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी काही परवान्यांचे नुतणीकरण करण्यास हरकत घेतली. तसेच गुन्हा नोंद असलेल्यांची यादीही महसूल विभागाला सोपविण्यात आली. यानंतर तत्कालिन जिल्हाधिकारी अविनाश पाठक व जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी ३६५ परवाने रद्द केले आहेत. सध्या जिल्ह्यात ९१६ लोकांकडे रिव्हॉल्वर परवाने आहेत. दरम्यान, मागच्या काळात जिल्ह्यात गंभीर गुन्हे नोंद असलेल्यांकडेही शस्त्र परवाने होते. महसूल विभागाने गुन्हे नोंद असलेल्यांचा अहवाल मागीतल्यानंतर गृह विभागाने यातील ९६ लोकांवर गुन्हे नोंद असल्याचा अहवाल दिला. त्यामुळे त्यांचेही परवाने रद्द करण्यात आले. तर, परवाने असलेल्यांमध्ये १०० व्यक्ती मयत आणि ७० वयोवृद्ध होते. त्यांचेही परवाने रद्द करण्यात आले आहेत.

नव्याने फक्त चार परवाने- या वर्षभरात नव्याने केवळ चार रिव्हॉल्वर परवाने देण्यात आले आहेत. यात तीन परवाने बँकांचे आहेत. रोकड इकडून तीकडे वाहतूक करण्यासाठी सुरक्षीतता म्हणून हे परवाने देण्यात आले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अग्नीशस्त्र परवान्यांचा आढावा घेतल्यानंतर आवश्यकता नसलेले, गंभीर गुन्हे नोंद असलेले तसेच वृद्ध व मयत व्यक्तींचे परवाने रद्द केले असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सांगितले.

## राष्ट्रीय महामार्गावर...

जखमी प्रवाश्यांना गोंदिया शासकीय रुग्णालयात रेफर करण्यात आले. त्यापैकी दोन रुग्णांना नागपूरला उपचारासाठी नेताना त्यांचा रस्त्यात मृत्यू झाला. तर आठ प्रवाशांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती डॉ. येडे यांनी दिली आहे. या बसमध्ये ५०च्या वर प्रवासी असल्याचे सांगण्यात येत आहे. सामाजिक कार्यकर्त्यांकडून मदत- अपघाताच्या आवाजामुळे धोबीसराळ गावातील नागरिक मदतीसाठी धावून आले. पोलिसांना सूचना मिळताच ते घटनास्थळी दाखल झाले. देवरी येथील हेल्पिंग ग्रुपच्या सदस्यांनी जखमींना रुग्णालयात हलविण्यास मदत केली. ग्रामीण रुग्णालयातील डॉ. अमित येडे व डॉ. नेहा मुलार यांनी ४० जखमीवर उपचार केले. जिल्ह्यातील सर्व १०८ रुग्णवाहिकांना बोलावून ११ गंभीर जखमींना गोंदिया येथे पुढील उपचारासाठी पाठविले. तपास साहाय्यक पोलिस निरीक्षक राठोड करीत आहेत.

## सौर ऊर्जेच्या....

यांची प्रमुख उपस्थिती होती. या विश्वविक्रमाची घोषणा करण्यासाठी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सचे कार्ल सॅबेले यावेळी उपस्थित होते.

या सोहळ्यास राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण व अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री मेघना साकोरे -बोर्डीकर, आमदार सर्वश्री संजय केणेकर, नारायण कुचे, प्रशांत बंब,सुरेश धस, श्रीमती. अनुराधा चव्हाण, मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार तथा मित्राचे संचालक प्रवीण परदेशी, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, सहसचिव (ऊर्जा) नारायण कराड, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, संचालक सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), योगेश गडकरी (वाणिज्य), राजेंद्र पवार (मानव संसाधन), कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता पवनकुमार कछोट तसेच अभिनेते संदीप पाठक, योगेश शिरसाट आदी मान्यवर उपस्थित होते.

सौरपंप स्थापित करण्याच्या क्षमतेत वाढ- मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रखर दुष्काळाचा सामना करतांना नेहमीच पाण्याची आणि विजेची अडचण होती. जलयुक्त शिवार योजनेमुळे पाण्याची उपलब्धता करतांना विजेच्या समस्येमुळे शेतकऱ्यांना सिंचन करण्यात अडचण होती. दिवसा वीज मिळावी ही प्रमुख मागणी होती. रात्री अपरात्री शेतावर जाण्यात विषारी जीवजंतू, जनावरांची भीती होती. त्यासाठी शासनाने शेतकऱ्यांचे फिडर हे सौर ऊर्जेवर नेण्याचे धोरण निश्चित केले. त्यातून एक लाख सोलर पंप ची योजना आखण्यात आली. ही योजना इतकी ,खूप चांगली असल्याने अन्य राज्यांनी जशीच्या तशी राबवावी,असे पत्र केंद्रांमार्फत इतर राज्यांना पाठविण्यात आले. त्यानुसार 'कुसुम' ही केंद्राची योजना तयार झाली. याच योजनेअंतर्गत आज देशात सर्वाधिक ७ लाख पंप राज्याने बसविले आहेत. शेतकऱ्यांनी मागणी केल्यापासून ते पंप बसविण्याच्या क्षमतेत वाढ करुन आपण प्रतिक्षा कालावधी कमी केला. महावितरणचे कर्मचारी अधिकारी. सगळ्या पुरवठादारांचे कर्मचारी, तंत्रज्ञ यांच्या मेहनतीमुळे आज आपण हा विश्वविक्रम करु शकलो. आता हा आपला विक्रम आपणच मोडू,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पुढच्या वर्षभरात सौर कृषी पंपांची संख्या १० लाख झाली पाहिजे,असेही त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना सांगितले.

## जामखेडमध्ये नर्तिकेनं....

शवविच्छेदनासाठी जामखेड ग्रामीण रुग्णालयात हलवला. या प्रकरणी दिपालीची मैत्रिण हर्षदा कामठे हिने दिलेल्या माहितीवरुन जामखेड पोलीस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## फुलंब्रीत रोहयो....

मजुरांच्या जागेवर पुरुषांचे तर पुरुषांच्या जागेवर महिलांचे फोटो अपलोड करून पाच कोटी १८ लाख रुपयांची बिले उचलल्याचा प्रकार या वृत्ताची दखत घेऊन राज्याचे रोहयो आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने दखल घेऊन चौकशीचे आदेश दिले. जिल्हा परीषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांनी सात जुलै रोजी यासाठी चौकशी समिती गठित केली. समितीने दिलेला पहिला अहवाल अपूर्ण असल्याने दुसऱ्यांदा चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार दुसऱ्यांदा संबधित समितीने अहवाल दिल्यानंतर सीईओ अंकित यांनी गटविकास अधिकाऱ्यांना संबंधित सात ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभा घेऊन सात रोजगार सेवकांची सेवा समाप्त करण्याचे निर्देश दिले आहेत. याचबरोबर पंचायत समिती मधील रोजगार हमी योजनेशी संबंधित ११ कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनुपमा नंदनवनकर यांनी दिली.

## शेतकरी कर्जमाफीचा...

मिळते. कर्जबाजारीपणामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या या शेतकऱ्यांसाठी संपूर्ण कर्जमाफीचा निर्णय मोठा दिलासा देणारा ठरणार आहे. रकमेवरील बंधने दूर केल्यामुळे लाखोंना पुन्हा कर्जपात्र होण्याचा मार्ग खुला होईल. राज्य सरकारने या व्यापक कर्जमाफीसाठी विशेष अभ्यास समिती नियुक्त केली असून, प्रविणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती कार्यरत आहे. ही समिती एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आपला सविस्तर अहवाल सरकारकडे सादर करणार आहे. यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली घेतल्या जाणाऱ्या अंतिम बैठकीत निर्णयाला शिक्कामोर्तब केले जाणार आहे. सरकारने ३० जूनपूर्वी संपूर्ण कर्जमाफी राबवण्याचे आश्वासन दिले असल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वी २०१७ मध्ये १.५ लाखांपर्यंत आणि २०१९ मध्ये २ लाखांपर्यंत कर्जमाफी जाहीर करण्यात आली होती. मात्र, अनेक शेतकऱ्यांचे कर्ज या मर्यादेपेक्षा जास्त असल्याने त्यांना दिलासा मिळू शकला नव्हता. त्यामुळे या वेळेस कर्जमाफी 'मर्यादारहित' करण्याचा निर्णय शेतकऱ्यांच्या मागणीवर आधारित असल्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, जिल्हानिहाय कर्जाची माहिती मागवण्यात आली असून संपूर्ण कर्जमाफीचे प्रस्तावित आराखडे तयार केले जात आहेत. या उपक्रमामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक चक्र पुन्हा गतीमान होण्याची, बँकांवरील विश्वास पुनर्स्थापित होण्याची आणि शेती क्षेत्रात नव्या गुंतवणुकीला चालना मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कर्जमाफीच्या या निर्णयामुळे राज्यातील सुमारे २५ लाख शेतकऱ्यांना थेट फायदा होणार असून, कृषी क्षेत्रात नवा अध्याय सुरू होणार असल्याचे चित्र समोर येत आहे.

## शेकडो उड्डाणे....

सुरुवात होत असून याच कारणासाठी शुक्रवारी मोठ्या प्रमाणात विमानसेवा रद्द करण्यात आली,' असे स्पष्टीकरण एल्बर्स यांनी दिले. या आधी करण्यात आलेल्या उपाययोजना पुरेशा नव्हत्या. त्यामुळे संपूर्ण नियोजनाची नव्याने आखणी करण्यात आली आहे. या कारणानेच शुक्रवारी दिवसभरात एक हजार उड्डाणे रद्द करण्यात आली. उड्डाण कर्मचाऱ्यांच्या कामाच्या तासावर नवीन नियमावलीनुसार आलेल्या मर्यादांबाबत (फ्लाइट ड्युटी टाइम लिमिटेशन) शिथिलता आणल्याबद्दल त्यांनी समाधानही व्यक्त केले.

वाढलेल्या तिकीटदरांचा प्रवाशांना धक्का- इंडिगोची एका मागून एक विमान उड्डाणे रद्द झाल्यानंतर इतर विमान कंपन्यांनी तिकिटांचे दर भरमसाठ वाढवायला सुरुवात केल्याचे चित्र समोर आले. शुक्रवारी दुपारी शनिवारसाठीच्या मुंबई ते कोलकाता तिकीटासाठी सर्वाधिक दर ६० ते ७० हजारांपर्यंत पोहोचल्याचे दिसत होते, असे काही नेटकऱ्यांनी सांगितले. दिल्लीच्या विमानासाठी ५० हजारांचा दर दिसत होता. रात्रीच्या सुमारास शनिवारसाठीच्या दिल्ली, चेन्नई, कोलकाता विमानांचे दर २० ते २५ हजारांपर्यंत पोहोचले होते. तर रविवारसाठी पुन्हा हे दर चढे असल्याचे समोर आले. मुंबईहून गोव्यासाठी शनिवारच्या विमानासाठीचे इतर कंपन्यांचे तिकिटांचे दर २२ ते ३६ हजारांपर्यंत होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## बीड-वडवणी ...

ट्रॅक परिसर संवेदनशील राहणार असून कोणतीही बेपर्वाई धोकादायक ठरू शकते, असं रेल्वे विभागाने नमूद केलं आहे. त्याचबरोबर परिसरात कोणतेही अडथळे, जनावरे किंवा अनधिकृत हालचाली आढळल्यास त्वरित दूर करण्याचं आवाहन स्थानिक संस्थांना करण्यात आले आहे. बीड-वडवणी रेल्वेमार्गाचा विकास हा मराठवाड्यातील प्रवासी वाहतुकीसाठी महत्त्वाचा टप्पा मानला जातो. चाचण्या सुरळीत पार पडल्यास या विभागाला प्रत्यक्ष रेल्वेसेवेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने मोठं पाऊल उचललं जाईल. त्यामुळे या प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी नागरिकांचं सहकार्य आवश्यक असल्याचे पुणे विभागाने स्पष्ट केलं आहे.

## रब्बीच्या पीकविम्याकडे...

मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत होती. आता गहू आणि हरभरा पिकाचा विमा कवच उतरविण्यासाठी १५ डिसेंबर २०२५ अंतिम तारीख असतानाही अल्प प्रतिसाद मिळत आहे. पेरा सर्वाधिक- धारूर, केज, पाटोदा या तालुक्यात ज्वारी, गहू, हरभरा या पिकांचा पेरा सर्वाधिक आहे. मात्र, सर्वात कमी गेवराई तालुका आहेत. या वर्षी जिल्ह्यातील शेतकरी रब्बी हंगामातील पीकविमा कवच काढण्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.

## काठोडा – वांगी....

त्यामुळे ०८/१२/२०२५ पर्यंत या रस्त्याचे काम सुरू न केल्यास राजुरी फाटा, ता. जि. बीड याठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल यासंदर्भात हरिभाऊ शेळके पाटील यांनी पत्र दिले आहे.

## जिल्हा न्यायालय...

असे एकूण ४७,५५८ प्रकरणे ठेवण्यात आली होती त्यापैकी १३०१ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. यामध्ये जवळपास १५ कोटी ६८ लाख ६६ हजार ६०५ रूपयांच्या प्रकरणामध्ये तडजोड झाली. सदरचे लोकन्यायालय यशस्वी करण्याकरिता जिल्हा वकील संघ व सर्व तालुका वकील संघ, पदाधिकारी, विधिज्ञ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्याप्रमाणे येणा-या १३ डिसेंबर २०२५ रोजी होणा-या लोकन्यायालयाबाबत बोलताना न्यायाधीश डब्ल्यू. ए. सय्यद म्हणाले की, लोक अदालतच्या निवाडयाविरूध्द अपील नाही, एकाच निर्णयात कोर्टबाजीतून कायमची सुटका होते, खटल्यांमध्ये साक्षी पुरावा, उलटतपासणी, दीर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात. निकाल झटपट लागतो, लोक अदालतीत होणारा निवाडा हा आपसात समजूतीने होत असल्याने कुणाची हार वा जीत होत नाही. लोक अदालतीचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो, परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील व्देष वाढत नाही व कटुताही निर्माण होत नाही. कोर्टाच्या हुकुमनाम्याप्रमाणे लोक अदालतीत होणा-या निवाडयाची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते, वेळ पैसा यांची बचत होते, इतकेच नव्हे तर लोक अदालतीत निकाली निघणा-या प्रकरणांमध्ये कायदयानुसार कोर्ट फीची रक्कम परत मिळते. आपली प्रलंबित तसेच दाखल व्हावयाचे आहेत अशी प्रकरणे लोक अदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवण्याकरता संबंधित न्यायालयातील तालुका विधी सेवा समिती अथवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा आणि लोक अदालतीमध्ये सहभागी होउन आपले वाद सामोपचाराने कायमचे मिटवावेत असे आवाहन न्यायाधीश सय्यद यांनी केले आहे.

## बीड जिल्ह्यातील ...

सुविधा वाढणे, स्वच्छता सुधारणे, बस थांबे आणि परिसर अधिक सुटसुटीत होणे अशा अनेक सोयी भविष्यात उपलब्ध होणार आहेत. पाटोद्याच्या नागरिकांसाठी ही मोठी विकासात्मक कामगिरी ठरली असून हा निर्णय आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या तातडीच्या निर्णयक्षमतेचे फलित असल्याची भावना स्थानिकांमध्ये व्यक्त होत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# आयडॉल शिक्षक शाळेसोबत समाजातही मोठा बदल घडवून आणतील: शिक्षण मंत्री दादाजी भुसे

## शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे राज्यस्तरीय आयडॉल शिक्षक कार्यशाळा



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

शिक्षणातील आव्हाने स्वीकारत गुणवत्तापूर्ण आणि आनंददायी शिक्षण देणारे आयडॉल शिक्षक शाळेसोबत समाजातही मोठा बदल घडवून आणतील, असा विश्वास शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी आज व्यक्त केला. समर्पित भावनेने काम करणाऱ्या शिक्षकांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासन सदैव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचेही ते म्हणाले.

तापडिया नाट्यमंदिर येथे शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे आयडॉल शिक्षक एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी शिक्षण मंत्री दादाजी भुसे बोलत होते. यावेळी शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह , राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अंकित, शिक्षण संचालक (योजना) कृष्णकुमार पाटील यांच्यासह राज्यभरातील आयडॉल शिक्षक म्हणून निवड झालेले शिक्षक उपस्थित होते.

शिक्षणमंत्री श्री.भुसे म्हणाले, राष्ट्र प्रथम हा शिक्षण पद्धतीचा गाभा आहे, त्या दृष्टीने शासकीय शाळांमध्येही मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा शासन सातत्याने काम करत आहे. त्या दृष्टीने पीएमश्री योजनेच्या धर्तीवर राज्यातही सीएमश्री योजनेच्या माध्यमातून ५ हजार शाळांच्या इमारती बांधण्यात येणार आहेत. त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. नुकतेच युपीएससी स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेले जवळपास ६० टक्के उमेदवार हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतून शिकलेले आहेत, शासकीय शाळेतून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते हे यावरून पहावयास मिळते. गरीब विद्यार्थी शिकला तर त्यांच्या कुटुंबाचीही प्रगती होते त्यामुळे शिक्षणाशिवाय पर्याय नाही. बदलत्या काळानुसार आधुनिक शिक्षण देण्यावर आपला भर असणार आहे. विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण देण्याचा दृष्टीने शिक्षक भरतीमध्ये कला व क्रीडा शिक्षक भरतीस प्राधान्य दिले जाईल असे ते म्हणाले. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास देशपातळीवर शिकविला जावा यासाठी केंद्राकडे मागणी केली असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिक्षकांनीही विद्यार्थ्यांशी संबंधित असलेल्या शासनाच्या योजनांची माहिती, त्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे यांची माहिती संबंधित विद्यार्थ्यांपर्यंत तसेच त्यांच्या पालकांपर्यंत पोहचवून त्यांना या योजनांचा लाभ मिळवून देण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करावा. त्यामुळे गरजू विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळू शकतो. शाळांमध्ये वर्षभरात विविध उपक्रमांबाबत राबविण्याबाबत शासन निर्णय जाहिर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख स्मृती पुरस्कारांचे १४ डिसेंबर रोजी देवडी येथे वितरण

**बीड । प्रतिनिधी**

देवडी येथील स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख सामाजिक विकास प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारया विविध पुरस्कारांचे वितरण रविवार दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी देवडी येथील माणिकबागेत आदर्श गाव योजनेचे अध्यक्ष श्री. पोपटराव पवार आणि उपमुख्यमंत्र्यांचे आरोग्य कक्ष प्रमुख श्री. मंगेश चिवटे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.. प्रतिष्ठानचे अध्यक्ष एस.एम.देशमुख यांनी एका प्रसिद्धी पत्रकाव्दारे ही माहिती दिली आहे. प्रतिष्ठानच्यावतीने स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कृषी, पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात योगदान देणारया मान्यवरांचा दरवर्षी गौरव केला जातो.. २०२४ च्या पुरस्कारांसाठी स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख सामाजिक सेवा पुरस्कार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, किसानपूत्र आंदोलनाचे प्रणेते श्री. *अमर हबीब* यांना जाहीर करण्यात आलेला आहे.. पत्रकारितेच्या क्षेत्रात गेली ४५ वर्षे कार्यरत राहून जनतेला न्याय मिळवून देणारे माजलगाव समाचारचे संपादक श्री. *सुहास देशमुख* आणि कृषी क्षेत्रातील अनेक अडचणींवर मात करून शेतीत विविध प्रयोग करणारे शेतकरी श्री. *गोरख झाटे* यांची निवड करण्यात आली आहे.. या सर्व मान्यवरांना १४ डिसेंबर रोजी पोपटराव पवार आणि मंगेश चिवटे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.. यावेळी अ. भा. मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने बीड जिल्हयातील काही ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान करण्यात येणार आहे..तसेच अपंगांसाठी कार्य करणारे मुंबईचे पत्रकार दीपक कैतके आणि मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल दिलीप सपाटे यांचा सत्कार करण्यात येणार आहे.. यावेळी परिषदेचे पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येनं उपस्थित राहणार आहेत..

या कार्यक्रमास सर्वांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन एस.एम देशमुख यांनी केले आहे.

## माऊली मा.विद्यालयात सामान्य ज्ञान स्पर्धा

**बीड । प्रतिनिधी**

माऊली विद्यापीठ केज संचलित,माऊली माध्यमिक विद्यालय, व्यवसाय अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालय,माऊली बालकाश्रम ,एमआयडीसी. बीड येथे राज्यसभेच्या खासदार सौ.रजनीताई पाटील यांचा वाढदिवस माऊली विद्यापीठाचे कोषाध्यक्ष नवनाथराव थोटे यांच्या उपस्थितीमध्ये विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांची सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा घेऊन विजेत्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नवनाथराव थोटे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी बोलताना म्हटले की , खासदार रजनीताई पाटील यांचे शैक्षणिक क्षेत्रात फार मोठे योगदान असुन गरीब,मजूर ,कामगारांच्या मुलांसाठी शिक्षणाची दारे खुली करुन निराधारांच्या मुलांसाठी वस्तीगृहाची सोय केली .यामुळे अनेक गरीब विद्यार्थ्यांना याचा फायदा झाला.गोरगरिबांना आधार देण्याचे काम केले. या नंतर विद्यार्थ्यांना केळी व सफरचंद या फळाचे वाटप करून शेवटी बक्षीस वाटप करण्यात आले.

## कै. रामदास दशरथ यमपुरे यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त बबन महाराज मंझेरीकर यांचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**

उदंड वडगाव (शिवाजीनगर), ता. बीड येथे कै. रामदास दशरथ यमपुरे यांच्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्त विशेष धार्मिक कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि. ०६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत प्रसिद्ध किर्तनकार बबन महाराज मंझेरीकर यांच्या कीर्तनाने परिसर भक्तिभावाने निनादणार आहे. कै. रामदास दशरथ यमपुरे हे आपल्या सुस्वभाव, सामाजिक बांधिलकी आणि लोकसंग्रहासाठी ओळखले जात. त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी पुण्यतिथीचे आयोजन करण्यात येते. यंदाच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त ग्रामस्थांसाठी आध्यात्मिक व सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करणारा कार्यक्रम सज्ज करण्यात आला आहे. कार्यक्रमात बबन महाराज मंझेरीकर जीवनमूल्ये, सदाचार, भक्तीभाव आणि सामाजिक एकात्मता यांवर आधारित कीर्तन सादर करणार आहेत. या कीर्तनाच्या माध्यमातून समाजातील एकोपा, नैतिकता आणि मानवतेचे संदेश दिले जाणार असून ग्रामस्थांत मोठी उत्सुकता आहे. कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात असून परिसरात स्वच्छता, मंडप व्यवस्था, आसन व्यवस्था तसेच ध्वनी विस्तार यंत्रणा यांची विशेष तयारी करण्यात आली आहे. ग्रामस्थ आणि यमपुरे परिवारातील सदस्य स्वयंसेवेच्या भावनेने कार्यरत आहेत. कै. रामदास यमपुरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित हा सोहळा सामाजिक एकजुटीचे, आध्यात्मिक जाणीवेचे आणि कुटुंबीयांच्या आदरभावाचे प्रतिक ठरणार आहे. या कीर्तन कार्यक्रमास गावातील नागरिकांसह आसपासच्या परिसरातील भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शहाजी रामदास यमपुरे, धनंजय रामदास यमपुरे, चंद्रकांत रामदास यमपुरे तसेच संपूर्ण यमपुरे परिवार यांनी केले आहे.

## सामाजिक कार्याचा गौरव : निर्मला खटोड यांना धर्मभूषण पुरस्कार

**बीड । प्रतिनिधी**

श्री दत्त दिगंबर पीठ लाडगाव, संभाजीनगर येथील देवस्थानाचे धर्माचार्य श्री श्री १००८ महामंडलेश्वर दत्तात्रय दहिवाळ महाराज यांच्या संस्थेमार्फत श्रीमती निर्मला खटोड यांना दत्त जयंती कार्यक्रमात, लाडगाव संभाजीनगर येथे 'धर्मभूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. श्रीमती निर्मला खटोड यांनी गेल्या २५ वर्षांपासून खटोड प्रतिष्ठानच्या माध्यमातून बीड शहरात अखंडपणे कीर्तन महोत्सव राबवला आहे.

खटोड प्रतिष्ठानमार्फत– ३०० गरजू नवरा–नवरींची सामूहिक लग्न सोहळे, अडीच हजार मुलींचे सामूहिक नामकरण, २०८ महिलांचे सामूहिक डोहाळे जेवण, असे अनेक उपक्रम राबविण्यात आले. त्याचप्रमाणे कॉपीमुक्त परीक्षा अभियान, वृक्ष संवर्धन, महिला अत्याचार विरोधी जनजागृती रॅली, चित्रकला



स्पर्धा, तसेच एमपीएससी–यूपीएससी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन असे उपक्रमही घेतले. राज्याचे प्रधान सचिव माननीय नंदकुमार साहेब यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय शैक्षणिक कार्यशाळा घेण्यात आली, ज्यामध्ये १०,००० शिक्षकांचा सहभाग होता. सरपंचांसाठी जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

## दत्त संस्थान, बालाघाट येथे दत्त जन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र दत्त संस्थान, बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे दत्त जन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साह, श्रद्धा आणि भक्तिभावाने संपन्न झाला. सद्गुरु शिवानंद शिवाचार्य महाराज यांच्या कृपाशिर्वादाने तसेच दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा भव्यदिव्य पद्धतीने पार पडला. कार्यक्रमाअंतर्गत दुपारी बारा वाजता दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्त



श्री दत्तांच्या मूर्तीचा अभिषेक, गोमातेची पूजा यांसारखे पारंपरिक विधी भाविकांच्या उपस्थितीत पार पडले. सकाळी उदंडवडगाव (शिवाजीनगर) येथील भजन मंडळाने सादर केलेले संगीत भजन भाविकांच्या मनाला स्पर्शून गेले. रात्री मोरगाव, मांजरसुंबा व वरवटी येथील भजनी मंडळाने सादर केलेल्या जागरणाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. सोहळ्यात साजरी करण्यात आलेली सती अनुसया मातांची झाकी विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. या झाकीची कु.प्रार्थना अमोल ढास यांनी प्रभावीपणे सादर केली. दत्त संस्थानाच्या परिसरात आयोजित या पवित्र जन्मोत्सव सोहळ्यास परिसरातील विविध गावांमधील भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली व भक्तिभावाने सहभाग नोंदविला.

## आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य यंत्रणा अधिक लोकाभिमुख, अधिक सक्षम, तंत्रशुद्ध व सेवाभावी बनवण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातील वेगवेगळ्या केडरवर काम करणाऱ्या राज्यभरातील सुमारे दोन लाख कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण देणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई येथे सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षणासंबंधी सादरीकरण करण्यात आले. या बैठकीला राज्यातील आरोग्य व कुटुंब



कल्याण प्रशिक्षण केंद्रांचे प्राचार्य, आरोग्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी, आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव ई. रविंद्रन, आरोग्यसेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉक्टर नितीन अंबाडेकर, आणि संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रशिक्षण हा आरोग्य क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. नागरिकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी, चांगली वागणूक देण्यासाठी, कामकाजात गतिमानता, तांत्रिक कौशल्य येण्यासाठी तसेच कार्यक्षमता वाढण्यासाठी प्रशिक्षण हा महत्त्वाचा घटक असल्याने, आरोग्य विभागात विविध पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना तांत्रिक व प्रशासकीय प्रशिक्षण देणार असल्याचे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी एसईआरसीएच, पीएचएफआय, आयएमएमएएसटी, इनिशिएटिव्ह ऑफ चेंज, ताम्हिणी घाट पुणे या प्रशिक्षण संस्थांनी सादरीकरण केले. या संस्थांच्या माध्यमातून प्रशिक्षण घेतलेल्या आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दूरदृश्य प्रणाली द्वारे आपले अनुभव सांगितले. प्रशिक्षणामुळे टेक्निकल स्किल, इथिकल व्हॅल्यू, टीम मॅनेजमेंट,

## छ. संभाजीनगर शहरामध्ये वर्किंग वुमेन्स होस्टेल व ओल्ड एज होम उभारण्याबाबतचा प्रस्ताव सादर करा: गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. भोयर

### गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याकडून म्हाडाच्या कामकाजाचा आढावा

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये वर्किंग वुमेन्स होस्टेल व ओल्ड एज होम उभारण्यात येणार असून या प्रकल्पासाठी आवश्यक जागा, सुविधा आणि निधी नियोजन याबाबत तातडीने शासनाकडे प्रस्ताव सादर करा, असे निर्देश गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज दिले.

गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या (म्हाडा), कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी बैठकीला मुख्य अधिकारी श्री. दत्तात्रय नवले, उप मुख्य अधिकारी श्री. जयकुमार नामेवार



व कार्यकारी अभियंता श्री. सुधाकर बाहेगव्हाणकर यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते. महिलांच्या सुरक्षेसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानपूर्वक जीवनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करणे ही शासनाची जबाबदारी असून छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये वर्किंग वुमेन्स होस्टेल व ओल्ड एज होम उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी शासन म्हाडास सर्वोतपरी मदत करेल, असेही राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले. गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामध्ये सद्यस्थितीमध्ये सुरू असलेल्या योजनांची तसेच मंडळास्तरावर अद्यापपर्यंत एकुण किती प्रकल्प पूर्ण झाले, पीएमएवाय व २० टक्के अंतर्गत सुरू प्रकल्प, पूर्ण झालेले प्रकल्प, प्रस्तावित प्रकल्प, गाळे, भुखंड,सदनिका, तसेच दुकाने व अनिवासी भुखंड किती शिल्लक आहेत तसेच पैकी शिल्लक गाळे,सदनिका,भुखंड तसेच दुकाने व अनिवासी भुखंड विक्रीचे नियोजन याबाबतही आढावा घेण्यात आला. विविध योजनांचा आढावा घेत काम पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्याचे निर्देश यावेळी मंत्री डॉ. भोयर यांनी दिले. गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचा महसुली जमा निधी किती आहे याबाबतचा आढावा घेत जास्तीत जास्त प्रकल्प राबवून महसूल वाढवण्याच्या दृष्टीने कामकाज करा तसेच म्हाडाकडे असलेल्या जागांचा आढावाही घेण्यात आला. जिल्ह्यातील शासनाच्या जागेपैकी किती जागा म्हाडाच्या प्रकल्पासांठी मिळू शकतात त्याची माहिती घेवून जास्तीत जास्त प्रकल्प राबवा. तसेच म्हाडा प्रकल्पांसाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले.

## हसन पटेल यांच्यावर शोकाकुल वातावरणाचा अंत्यसंस्कार



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील नागापूर खुर्द येथील रहिवासी असलेले अनेक वर्ष नागापूर या गावचे पोलीस पाटील राहिलेले स्वर्गीय केशर काकू व माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे खंदे समर्थक हसन खान पठाण उर्फ हसन पटेल यांचे बुधवारी रात्री दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर गुरुवारी दुपारी दोन वाजता नमाज नंतर अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्या राहत्या गावी नागपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

बीड तालुक्यातील नागापूर खुर्द येथील पोलीस पाटील आणि माजी खासदार स्वर्गीय केसर काकू तसेच माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे खंदे समर्थक आणि क्षीरसागर घराण्यावर निष्ठा असलेले हसन खान पठाण यांचे बुधवारी रात्री दीर्घ आजाराने निधन झाले .मृत्यू समयी त्यांचे वय ९० वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. नागपूरचे उपसरपंच अलीम खान पठाण, बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सेवानिवृत्त सचिव हरून खान पठाण, करीम खान पठाण यांचे ते वडील होते. त्यांच्यावर गुरुवारी दुपारी नमाज नंतर त्यांच्या राहत्या गावी नागापूर खुर्द येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी बीड तालुक्यातील मोठ्या संख्येने नागरीक, गावातील ग्रामस्थ, नातेवाईक, मित्रपरिवार आणि राजकारणातील सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## जाहीर प्रगटन

**मा.श्री. कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १८३०/ २०२५**

**मिराबाई माने वि. निरंक**

मागणी :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदार: १) मिराबाई भ्र. दिलीप माने, वय: ३५ वर्षे, धंदा: घरकाम, रा. ताडसोन्ना, ता. जि. बीड २) दिलीप पि बाबुराव माने, वय: ३८ वर्षे, धंदा: शेती, रा. ताडसोन्ना ता. जि. बीड

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे दिक्षा पि.दिलीप माने, राहणार – ताडसोन्ना, ता. जि. बीड हे दिनांक ०५/०८/२०२३ रोजी ताडसोन्ना ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क्र. १ ही मयताची आई असुन अर्जदार क्र. २ हे मयताचे वडील आहेत. मयत हि मृत्युसमयी अविवाहीत होती.

मयत नामे दिक्षा पि. दिलीप माने, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की,जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा वुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत दिक्षा पि. दिलीप माने यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख २२/०१/२०२५ आहे.

आज दिनांक ०४/१२/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

विधीज्ञ – श्री. चोले आर. आर.

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर बीड

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. ०६ डिसेंबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### दगफेक प्रकरणातील फुटेज पोलिसांच्या ताब्यात

बीड । प्रतिनिधी

गेवराई येथील कृष्णाई निवासस्थानावर आणि कार्यालयावर झालेल्या हल्ल्याचे तीव्र पडसाद उमटत आहेत. या प्रकरणी माजी आमदार अमरसिंह पंडित आणि आमदार विजयसिंह पंडित यांनी गुरुवारी (दि.४) दुपारी पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी हल्ल्याचे सीसीटीव्ही फुटेज असलेला पेनड्राईव्ह पोलिसांकडे सुपूर्द करत, हा हल्ला पूर्वनियोजित कट असून, अमरसिंह पंडित यांच्या जीवाला धोका असल्याचा गंभीर आरोप केला.निवडणुकीच्या दिवशी घडलेल्या या राडा प्रकरणी पंडितांनी पोलिस अधीक्षकांना सविस्तर निवेदन दिले. यावेळी पत्रकारांशी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, त्रिंबक पवार याने गुंड आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना सोबत घेऊन आमच्या कृष्णाई कार्यालयावर हल्ला केला. याचे सर्व पुरावे आणि सीसीटीव्ही फुटेज आम्ही पोलिसांना दिले आहेत. त्रिंबक पवार हा १९९७च्या एका खुनाच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा भोगून चांगल्या वर्तणुकीच्या बॉण्डवर बाहेर आलेला आहे. सीसीटीव्हीमध्ये कैद झाला थरार-पोलिसांना दिलेल्या फुटेजमध्ये त्रिंबक पवार स्वतः गाडी चालवत येत असल्याचे आणि त्याने तिथे उभ्या असलेल्या वाहनाला जाणीव-पूर्वक धडक दिल्याचे दिसत आहे, असा दावा पंडितांनी केला. अमृत डावकर यांच्या जबाबातही जिवे मारण्याचे षडयंत्र होते, असे नमूद करण्यात आले आहे.

### बीड जिल्ह्यातील गेवराईच्या बाजारातून शेवगा झाला गायब

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे सर्वच पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. हिवाळा व उन्हाळ्यात चांगला मिळतो या आशेवर शेतकऱ्यांनी लावलेल्या शेवगा पिकाचेही मोठे नुकसान झाले असल्याने उत्पादनात मोठी घट झाली आहे. त्यामुळे शेवग्याची आवक गेवराईच्या बाजारात घटली असल्याने आठवडी बाजार व भाजीमंडईतून शेवगा गायब झाला आहे. शेवगा हा रोजच्या जेवणातील महत्वाचा घटक असून पौष्टिक, औषधी व आरोग्यवर्धक गुणधर्मांमुळे त्याला बाजारात कायम मागणी असते. मात्र यंदाच्या पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टी, कीडरोगाच्या प्रादूर्भावामुळे शेवग्याच्या बागेचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे उत्पादनात मोठी घट झाली आहे. ग्रामीण भागातून आता शेवगा येणे पूर्णपणे बंद झाले आहे. आठवडभरात क्वचितच एखादा कॅरेट मिळतो. मागणी जास्त असल्याने दर आपो-आप वाढत चालले आहेत. शेतकरी वर्गातही चिंता वाढली असून उत्पादन पुन्हा सुरळीत होण्यासाठी हंगामी स्थिती सुधारण्याची गरज व्यक्त केली जात आहे. पुढील महिन्यात वातावरण स्थिर राहिल्यास बाजारात शेवग्याचा पुरवठा वाढेल आणि दर काही प्रमाणात कमी होती, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

### बीड – हायवा ने परप्रांतीय मजुराला चिरडले

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातीलकानडी माळी येथे खडी क्रशरवर काम करणाऱ्या झारखंड राज्यातील २५ वर्षीय परप्रांतीय मजुराचा खडी व दगडाची वाहतूक करणाऱ्या हायवाने खदाणीच्या भिंतीलगत चिरडल्याने मृत्यू झाला. मोहम्मद साहिल प्रवाज (वय २५, रा. झारखंड) असे मृत मजुराचे नाव आहे. ही घटना बुधवारी (दि. ३) सकाळी ६:३० वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत अधिक माहिती अशी की, बुधवारी सकाळी ६:३० वाजण्याच्या सुमारास मोहम्मद साहिल प्रवाज हा खदाणीच्या भिंती लगत उभा होता. त्या वेळी खडी व दगडाची वाहतूक करणाऱ्या हायवा (एम एच-२०/इ जी- ४०१२) चालक बाजीराव बापुराव फुंदे (रा. जिवाचीवाडी ता. केज) याने हायवा निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवल्यामुळे मोहम्मद हा खदानीचे कडेला दबल्याने तो गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला.

### पी.एम. किसान योजना : लाभ संशयीत कुटूंबाची व अल्पवयीन लाभार्थीची पडताळणी करण्याचे केंद्र शासनाचे निर्देश

बीड । प्रतिनिधी

राज्यात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना ही २४ फेब्रुवारी २०१९ रोजी सुरू करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी ६०००/- रुपयांची अर्थिक मदत दिली जाते. योजनेच्या सुरुवातीपासून आतापर्यंत २१ हप्त्यांद्वारे राज्यातील पात्र शेतकऱ्यांना रक्कमेचा लाभ वितरीत करण्यात आला आहे, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्य केंद्रशासीत प्रदेशातील जमीनीच्या नोंदीप्रमाणे लागवडीयोग्य जमीनधारक एका शेतकरी कुटुंबातील (पती, पत्नी आणि अल्पवयीन मुले) फक्त एक सदस्य योजनेचा लाभ मिळण्यास पात्र आहे. पुर्वीच्या जमीन धारकांच्या मृत्यूनंतर वारसाहक्कामुळे दि.०१ फेब्रुवारी २०१९ नंतर जमीन हस्तांतरीत झाली आहे. असे शेतकरी या योजनेसाठी पात्र आहेत. तसेच इतर कारणांनी (वाटणीपत्र, खरेदी, बक्षीसपत्र, इ.) दि ०१ फेब्रुवारी २०१९ नंतर जमीनधारक झालेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही, पी एम किसान योजनेमध्ये लाभार्थी समाविष्ट करण्यासाठी त्यांच्या पात्रतेचे सत्यापन करून कोणताही अपात्र लाभार्थी योजनेमध्ये समाविष्ट होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. यासाठी केंद्र शासनाने पी एम किसान योजनेच्या लाभार्थीची डेटा पडताळणी केली असता या प्रक्रीयेअंती काही विसंगती समोर आलेल्या आहेत. काही प्रकरणांमध्ये असे आढळून आले आहे की, एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक सदस्याना लाभ मिळत आहे. याशिवाय ०१ फेब्रुवारी २०१९ नंतर जमीनधारक झालेल्या काही लाभार्थ्यांनी चुकीची माहीती दिलेली आहे. या चुकीच्या बाबींचे निराकरण करण्यासाठी केंद्र शासनाकडून अशा लाभार्थ्यांचे प्रामुख्याने खालील चार प्रकारांमध्ये लाभ तात्पुरते रोखण्यात आले आहेत.

### प्रधानमंत्री पीक विमा योजना रब्बी हंगाम २०२५-२६: सहभागासाठी शेतकऱ्यांना आवाहन

बीड । प्रतिनिधी

रब्बी हंगाम २०२५-२६ करिता प्रधानमंत्री पीक विमा योजनेत शेतकरी सहभाग सुरु झाला आहे. पीक विमा या विषयी शेतकऱ्यांमध्ये जागरुकता वाढविणे व शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीकोनातून प्रत्येक हंगामात पीक विमा सप्ताह व महिनाभर नोंदणी मोहिमेचे आयोजन करण्यात येत आहे. त्यानुसार रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये दिनांक १ ते ७ डिसेंबर २०२५ दरम्यान १० वा पिक विमा सप्ताह राबविण्यात येत आहे. तसेच डिसेंबर, २०२५ नोंदणी मोहीम राबविण्यात येत आहे. हा उपक्रम प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत क्षेत्र व्याप्ती वाढवण्याच्या उद्देशाने, शेतक-यांना व्यापक जोखीम कव्हर प्रदान करण्याचा आणि पीक नुकसानीच्या प्रतिकूल परिस्थितीतही त्यांना भक्कम करण्याचा प्रयत्न करतो. शेतकऱ्यांना यंदाच्या सन २०२५-२६ मधील रब्बी हंगामातील ▶▶ उर्वरित पान २ वर

# साईबाबांच्या दर्शनाला जाणाऱ्या तेलंगणाच्या भाविकांना गेवराईजवळ रॉडचा धाक दाखवून लुटले

गेवराई । प्रतिनिधी

साईबाबांच्या दर्शनाला जाणाऱ्या तेलंगणा राज्यातील भाविकांच्या कुटुंबाला गेवराई तालुक्यातील धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वरील वडगाव ढोक फाटा येथे लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. बुधवारी मध्यरात्री १२:३० वाजण्याच्या सुमारास ही भीषण रस्ता लूट झाली. शिवप्रसाद किशोरकुमार पौने (रा. कल्पना सोसायटी, गणेशनगर, जि. रंगारेड्डी, तेलंगणा) हे आपल्या कुटुंबासह कारने क्र. (टीजी ०८ एबी ६९८९) शिर्डीला जात होते. वडगाव ढोक फाट्यावर महिला शौचालयासाठी थांबल्या असताना, त्या परत गाडीत बसताच तोंडाला रुमाल बांधलेल्या अज्ञात चार चोरट्यांनी अचानक त्यांच्या गाडीची काच फोडली. चोरट्यांनी हातात लोखंडी रॉड आणि अन्य हत्यारे घेऊन कुटुंबातील सदस्यांना धाक दाखवून मारहाण केली. त्यानंतर त्यांनी महिलांचे सोन्याचे मंगळसूत्र आणि इतर दागिने तसेच पुरुषांच्या गळ्यातील चेन असा तब्बल ३ लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने हिसकावून घेतला आणि पसार झाले. या प्रकरणी शिवप्रसाद किशोरकुमार पौने यांच्या फिर्यादीवरून गेवराई पोलिस ठाण्यात अज्ञात चार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल कटके आणि पोलिस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अण्णासाहेब पवार अधिक तपास करत आहेत.

**● महामार्गावरील सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह ●**

**अंधाऱ्या आणि निर्जन पट्ट्यात घडलेल्या या धाडसी लूटप्रकरणामुळे महामार्गावरील सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी वाढत्या प्रवासी वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारचे गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.**

## बीड-वडवणी मार्गवर शनिवारी रेल्वे इंजिन धावणार

### पुणे रेल्वे विभागाच्या नागरिकांना महत्वाच्या सूचना

बीड । प्रतिनिधी

अहमदनगर-बीड-परळी या रेल्वे प्रकल्पातील बीड ते वडवणीदरम्यान नव्याने तयार झालेल्या ब्रॉडगेज मार्गावर ६ डिसेंबर रोजी इंजिन चाचणी पार पडणार आहे. त्यामुळे अंतिम टप्प्यात काम असलेल्या या विभागाकडे प्रशासनासह परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. पुणे रेल्वे विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली असून चाचणी दरम्यान सुरक्षिततेच्या सूचना काटेकोरपणे पाळण्याचे आवाहन केलं आहे.पुणे विभागाने दिलेल्या वेळापत्रकानुसार, इंजिन ६ डिसेंबरला रन घेतल्यानंतररेल्वे सुरक्षा आयुक्तांची (सीआरएस) १० व ११ डिसेंबरला तपासणी तसेच स्पीड चाचण्या होणार आहेत. या तपासण्यांमध्ये ट्रॅकची गुणवत्ता, गाडीचा वेग सहन करण्याची क्षमता, ब्रेकिंग आणि तांत्रिक सुरक्षितता या विविध घटकांची तपासणी करण्यात येईल. चाचण्यांचे निष्कर्ष सकारात्मक असल्यास या मार्गावर प्रवासी सेवा सुरू करण्यात येणार आहे. दरम्यान, रेल्वे ट्रॅकजवळील गावांमधील नागरिक, शेतकरी आणि गुरेढोरे मालकांना चाचणीच्या दिवशी विशेष जागरूक राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ट्रॅकच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण, भटकणारी जनावरे किंवा अनधिकृतरीत्या ट्रॅक ओलांडणं टाळावं असं आवाहन करण्यात आले आहे. चाचण्यांदरम्यान वेगाने धावणाऱ्या इंजिनमुळे अपघाताचा धोका वाढू शकतो, याची जाणीव ठेवून नागरिकांनी ट्रॅकपासून सुरक्षित अंतर राखण्याची विनंती प्रशासनाकडून करण्यात आली आहे. चाचण्यांसाठी सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत हाय-स्पीड रन आयोजित केले जाणार आहेत. त्यामुळे या काळात ▶▶ उर्वरित पान २ वर



बीड-वडवणी मार्गवर शनिवारी रेल्वे इंजिन धावणार

## रब्बीच्या पीकविम्याकडे शेतकऱ्यांनी फिरवली पाठ

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात रब्बी हंगामात हरभरा, गहू, ज्वारी तसेच उन्हाळी धानाची लागवड केली जाते. ज्वारीचे क्षेत्र अत्यल्प असल्याने अनेक शेतकरी या पिकाचा विमा उतरवत नाहीत. सध्या रब्बी हंगामातील पेरणी झालेली आहे. अशातच पीकविमा भरण्यास सुरवात झाली असतानाही शेतकऱ्यांनी पीकविमा भरण्याकडे पाठ फिरवल्याचे दिसून येते. कृषी विभागाने शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करून शेतकऱ्यांना पीकविमा उतरवण्यासाठी प्रवृत्त करणे आवश्यक आहे. तेव्हाच शेतकरी रब्बी हंगामातील आपल्या पिकांना सुरक्षा कवच देऊ शकतील. विशेष म्हणजे, रब्बी हंगामात अवकाळी पावसामुळे नुकसान होऊनही कंपन्यांकडून नुकसानभरपाई मिळत नाही, असा शेतकऱ्यांचा समज आहे. यामुळेच शेतकरी रब्बी हंगामात पीकविमा उतरवण्याकडे दुर्लक्ष करतात, असाही मागील काही वर्षांतील अनुभव आहे. गतवर्षीच्या खरीप हंगामातील पीक विम्याचे पैसे शेतकऱ्यांना उशिरा मिळाले. काही शेतकऱ्यांना अल्प राशी मिळाल्याचाही प्रकार उघडकीस आला होता. खरीप हंगामात जिल्ह्यात अनेक शेतकऱ्यांनी पीकविमा उतरविला होता. परंतु, रब्बी हंगामात उदासीनता दिसून येत आहे. दरम्यान, ज्वारीचा पीकविमा उतरवण्याची ▶▶ उर्वरित पान २ वर

## काठोडा – वांगी रस्त्याचे काम सुरू न केल्यास राजुरी फाटा येथे रास्ता रोको

### हरीभाऊ शेळके यांचे कार्यकारी अभियंता यांना पत्र

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ढेकनमोहा पंचायत समिती गणातील काठोडा वांगी रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्याची मागणी शिवसेनेचे हरिभाऊ शेळके पाटील यांनी केली आहे. शिवसेनेचे युवा नेते हरिभाऊ शेळके पाटील यांनी कार्यकारी अभियंता, ग्रामीण विकास रस्ते यंत्रणा, बीड यांना काठोडा-वांगी रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे यासाठी पत्र दिले आहे. बीड तालुक्यातील ढेकनमोहा पंचायत समिती गणामधील प्रामा १६ जवळ काठोडा-वांगी रस्ता १/९०० ते ८/६०० चे काम काही दिवसांपूर्वी संबंधित कार्यालयाच्या वतीने करण्यात आले होते. आज रोजी सदरील कामाची दुरुस्ती कालावधी (डीएलपी) अंतर्गत सदरील काम तात्काळ रहदारी योग्य करणेबाबत संबंधित कंत्राटदाराला आदेश द्यावेत याबाबतीत संबंधित कार्यालयाला दि.२७/११/२०२५ रोजी अर्ज दिला होता.मात्र कोणताही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी त्याठिकाणी पाहणी करण्यासाठी आलेला नाही. ▶▶ उर्वरित पान २ वर



## बीडमध्ये चोरट्यांनी रात्रीतून जालिंदरनाथ मंदिरातील दानपेट्या उचलून नेल्या

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यात पुन्हा एकदा मंदिरात चोरट्यांनी धुमाकूळ घातलाय. श्री क्षेत्र येवलवाडी येथील प्रसिद्ध जालिंदरनाथ देवस्थानात रात्रीच्या सुमारास चोरट्यांनी प्रवेश करत दोन दानपेट्या उचलून नेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. देवस्थानातील दानपेट्यांवर हात साफ करणाऱ्या चोरट्यांचा संपूर्ण कारनामा येथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाला आहे. ही घटना गुरुवारी मध्यरात्री साधारण १.३० वाजताच्या सुमारास घडली. अधिकची माहिती अशी की, मंदिर परिसरात अंधाराचा फायदा घेत तीन चोरटे शांतपणे आत शिरले. आधी परिसराची पाहणी करून त्यांनी दानपेट्या तोडल्या आणि काही सेकंदांतच संपूर्ण ऐवज घेऊन फरार झाले. कॅमेऱ्यात दिसणाऱ्या फुटेजमध्ये तीनही चोरटे चेहऱ्यावर कपडा बांधून हलचाल करताना दिसत असल्याने त्यांची ओळख पटवणे आव्हानात्मक ठरण्याची शक्यता वर्तवली जाते.




## भैरोबा वस्ती बलात्कार प्रकरण; आरोपींचा जामीन अर्ज फेटाळला

बीड । प्रतिनिधी

भैरोबा वस्ती परिसरातील सामूहिक बलात्कार प्रकरणातील आरोपींचा जामीन अर्ज जिल्हा न्यायालयाने नामंजूर केला आहे. फिर्यादीच्या वतीने ॲड. तेजेस एस. नेहरकर यांनी प्रभावी युक्तिवाद करत आरोपींच्या बाजूतील विसंगती व पुराव्यांतील तफावत न्यायालयाच्या निदर्शनास आणल्याने हा महत्त्वपूर्ण निर्णय देण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.दिनांक १३/११/२०२५ रोजी फिर्यादी भैरोबा वस्ती येथुन नांदमाळावर गेली असता आरोपीने फिर्यादीस कागदपत्र घेवुन या अशा बहाण्याने बोलवुन घेतले. त्यानंतर संगनमत करून आरोपींनी फिर्यादीला स्कुटीवरून परत येत असताना कोंबडीपालनाच्या शेडजवळ अडवून तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. फिर्यादीने घडलेल्या अत्याचाराची माहिती नातेवाईकांना दिली. त्यानंतर फिर्यादीला तात्काळ मिरजगाव येथील दवाखाण्यात नेण्यात आले व त्यानंतर पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलवण्यात आले. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून आष्टी पोलिस ठाण्यात आरोपी बाळू अप्पासाहेब काळे, अप्पासाहेब बापुराव काळे, अजिनाथ बापुराव काळे, श्याम उर्फ श्यामराजे अजिनाथ काळे (सर्व रा. ता. आष्टी, जि. बीड) यांच्या विरोधात गु.र.नं. ५२९/२०२५ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ७० (१) व ३(५) प्रमाणे १५ नोव्हेंबर २०२५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला. त्या नंतर आरोपींनी फौजदारी जामिनासाठी अर्ज क्र. ११६१/२०२५ जिल्हा न्यायाधीशांकडे दाखल केला होता. या सुनावणीत फिर्यादीच्या वतीने ॲड. तेजेस नेहरकर यांनी आरोपींच्या बचावातील मुद्दे अपुरे व अविश्वसनीय असल्याचे न्यायालयासमोर मांडले. घटनास्थळ. वैद्यकीय पुरावे, तसेच फिर्यादीचे जबाब यावर आधारित मांडलेल्या युक्तिवादाला न्यायालयाने मान्यता दिली. न्यायालयाने सर्व पुरावे आणि परिस्थितीचा विचार करून आरोपींचा जामीन अर्ज नामंजूर केला. या प्रकरणात ॲड. नेहरकर यांना ॲड. गौतम जी. नाईकवाडे व ॲड. सिंकदर इस्लाम शेख यांनी सहकार्य केले.

## जिल्हा न्यायालय, तालुका न्यायालयांमध्ये १३ डिसेंबरला होणार लोक अदालत

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशानुसार दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी बीड जिल्हा न्यायालय व सर्व तालुका न्यायालयामध्ये आनंद एल.यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांचे मार्गदर्शनाखाली लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर लोकन्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे आणि दाखल पूर्व प्रकरणे सुनावणीसाठी लोक अदालतीमध्ये ठेवता येतील. संबंधित पक्षकारांनी आपल्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी येत्या १३ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित केलेल्या लोकअदालतीमध्ये आपले प्रकरणे तडजोडीसाठी ठेवावे असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश व.स्तर डब्ल्यू. ए. सय्यद यांनी केले आहे. या पूर्वी दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या लोकन्यायालयामध्ये संपूर्ण बीड जिल्हयातून प्रलंबित व दाखलपूर्व ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्ह्यातील पाटोदा बस स्थानकासाठी चार कोटी निधीची मान्यता

पाटोदा । प्रतिनिधी

शहरातील बस स्थानकाच्या उभारणीत महत्त्वाची भर घालत महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाकडून तब्बल चार कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. ही मंजुरी मिळवण्यासाठी आमदार सुरेश धस यांनी गेल्या अनेक महिन्यांपासून सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. त्यांनी वारंवार परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे पाटोदा बस स्थानकाच्या आवश्यक कामांसाठी निधी मंजुरीचा प्रस्ताव पुढे रेटला होता. अखेर त्यांचा पाठपुरावा फलदायी ठरला असून पाटोद्यासाठी हा मोठा विकासात्मक निर्णय ठरला आहे. प्रशासकीय मंजुरीतील प्रमुख कामांमध्ये पाटोदा बस स्थानक समोरील तसेच बस स्थानक गॅरेज समोरील उर्वरित कॉंक्रिटीकरण, बस स्थानक परिसराला संरक्षण भिंत उभारणी, या दोन अत्यावश्यक पायाभूत सुविधा सामावल्या आहेत.

गेल्या काही वर्षांपासून बस स्थानक परिसरात अर्धवट कॉंक्रिटीकरणामुळे पावसाळ्यात चिखल, पाणी साचणे, रस्त्यांवर खड्डे तयार होणे व बस वाहतुकीला अडचणी निर्माण होणे असे प्रश्न सतत उपस्थित होते. प्रवाशांना बसमध्ये चढताना व उतरताना मोठा त्रास सहन करावा लागत होता. तसेच बस स्थानकाच्या कडेला संरक्षण भिंतीअभावी सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत होता. या सर्व तक्रारींचा आढावा घेत आमदार धस यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून सर्व समस्यांची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना लेखी व तोंडी स्वरूपात सातत्याने दिली. परिवहन मंत्री सरनाईक यांनीदेखील पाटोदा शहरातील वाढत्या प्रवासी संख्येचा, ग्रामीण भागातील ये-जा करणाऱ्या शेतकरी, विद्यार्थी व कामगारांचा विचार करून तातडीने प्रशासकीय मान्यता देण्याचे आदेश दिले. यामुळे पाटोद्याचे बस स्थानक आता आधुनिक आणि सुव्यवस्थित रूपात उभे राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आगामी काळात या निधीतून होणाऱ्या कॉंक्रिटीकरणामुळे बस स्थानक परिसर पूर्णपणे मजबुत होईल, वाहतूक सुरळीत व सुरक्षित बनेल, तर संरक्षण भिंत उभारणीमुळे संपूर्ण क्षेत्राला संरक्षित चौकट प्राप्त होईल. प्रवासी ▶▶ उर्वरित पान २ वर